मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्राप्त करावयाच्या अर्थसहाय्याबाबतच्या अटीं व शर्तीबाबत.

# महाराष्ट्र शासन

## मुख्यमंत्री सचिवालय

परिपत्रक क्रमांक :- मुमंसनि-२०२५/प्र.क्र.०१/निधी कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २२.०१.२०२५

<u>परिपत्रक :-</u>

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रूग्णांना दुर्धर अजारावरील वैद्यकीय उपचाराकरीता येणाऱ्या खर्चासाठी मदत करण्यात येते. परंतू, रूग्णांकडून आरोग्यविषयक विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात येतो. त्यामुळे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रूग्णांना दुर्धर अजारावरील वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

I. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) किंवा अन्य कोणत्याही शासकीय योजनेमधून अर्थसहाय्य मिळाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून प्राप्त अर्थसहाय्य खर्च करू नये.

II. अर्थसहाय्य रक्कम वा त्याचा अंशभाग कोणत्याही परिस्थितीत रूग्णास परतफेड करण्यात येऊ नये.

III. मुख्यमंत्री सहाय्यता निधी स्विकृत होण्यापुर्वीच रूग्णालयातून डिस्चार्ज झालेल्या रूग्णांच्या उपचारांसाठी अर्थसहाय्याचा उपयोग करू नये.

IV. रूग्णासाठी देण्यात आलेले अर्थसहाय्य ९० दिवसांत उपयोगात आणावे अन्यथा शिल्लक राहिल्यास ९० दिवसांत खालील बँक खात्यात वर्ग करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| खातेदाराचे नाव | - | Chief Minister Relief Fund |
| बँकेचे नांव व शाखा (कोड) | - | State Bank of India, Main Branch, Fort (00300) |
| बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड | - | 10972433751, SBIN0000300 |

V. या रकमेचा विनियोग केवळ ज्या रुग्णाकरीता निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याच रूग्णाच्या नमूद उपचारासाठी अनुज्ञेय राहील.

VI. उपरोक्त अर्थसहाय्याचा उपयोग वरील रूग्णांकरिता केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र रूग्ण डिस्चार्ज झाल्यापासून १५ दिवसांत aaouti.cmrf-mh@nic.in या ई-मेलवर पाठवावे. डिस्चार्ज कार्डची छायांकित प्रत यथाशिघ्र सादर करण्यात यावी.

VII. अटी व शर्ती यांचे उल्लंघन झाल्यास संबंधित रुग्णालय दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

VIII. उपरोक्त संदर्भात काही शंका असल्यास aaouti.cmrf-mh@nic.in या ई-मेलवर किंवा ०२२-२२०२६९४८ या दुरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधावा.

३. सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SHARAD RAMLING GHAVATE

Digitally signed by SHARAD RAMLING GHAVATE
Date: 2025.01.22 18:39:29 +05'30'

(शरद रा. घावटे)
कक्ष अधिकारी
मुख्यमंत्री सचिवालय

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी
७. कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
८. सर्व नोंदणीकृत रुग्णालये.
९. निवड नस्ती.